01.12.2025 प्रभातःमुरली ओम शांती बापदादा मधूबन

"गोड मुलांनो - दररोज विचार सागर मंथन करा तर आनंदाचा पारा चढेल, चालता-फिरता आठवण रहावी की आम्ही स्वदर्शन चक्रधारी आहोत"

प्रश्नः- आपली उन्नती करण्याचे साधन कोणते आहे?

उत्तरः- आपल्या उन्नतीसाठी रोज पोतामेल ठेवा. चेक करा - आज पूर्ण दिवसभरामध्ये कोणते आसुरी काम तर केले नाही ना? जसे विद्यार्थी आपले रजिस्टर ठेवतात, तसे तुम्ही मुले देखील दैवी गुणांचे रजिस्टर ठेवा तर उन्नती होत राहील.

गीतः- दूर देश का रहने वाला...

ओम् शांती. मुले जाणतात दूर देश कशाला म्हटले जाते. दुनियेमध्ये एकही मनुष्य जाणत नाही. भले कितीही मोठा विद्वान असो, पंडित असो, परंतु याचा अर्थ समजत नाही. तुम्ही मुले समजता. बाबा, ज्यांची सर्व मनुष्यमात्र आठवण करतात की, 'हे भगवान...' ते जरूर वरती मूलवतनमध्ये आहेत, इतर कोणालाही हे ठाऊक नाही आहे. या ड्रामाच्या रहस्याला देखील आता तुम्ही मुले समजता. सुरुवातीपासून आतापर्यंत जे झाले, जे होणार आहे, सर्व बुद्धीमध्ये आहे. हे सृष्टी चक्र कसे फिरते, ते बुद्धीमध्ये राहिले पाहिजे ना. तुम्हा मुलांमध्ये देखील नंबरवार समजतात. विचार सागर मंथन करत नाहीत त्यामुळे आनंदाचा पारा देखील चढत नाही. उठता-बसता बुद्धीमध्ये राहिले पाहिजे की आपण स्वदर्शन चक्रधारी आहोत. आदि पासून अंतापर्यंत मज आत्म्याला संपूर्ण सृष्टीच्या चक्राबद्दल माहिती आहे. भले तुम्ही इथे बसला आहात, बुद्धीमध्ये मूलवतन आठवत आहे. ते आहे स्वीट सायलेन्स होम, निर्वाण धाम, सायलेन्स धाम, जिथे आत्मे राहतात. तुम्हा मुलांच्या बुद्धीमध्ये पटकन येते, बाकी कोणाला माहित नाही आहे. भले कितीही शास्त्रे इत्यादी वाचत, ऐकत आले, परंतु फायदा काहीच नाही. ते सर्व आहेत उतरत्या कलेमध्ये. तुम्ही आता चढत आहात. परत जाण्यासाठी स्वतः तयारी करत आहात. हे जुने वस्त्र सोडून आपल्याला घरी जायचे आहे. आनंद होतो ना! घरी जाण्यासाठी अर्धा कल्प भक्ती केली आहे. शिडी खाली उतरतच गेलो. आता बाबा आम्हाला सोपे करून समजावून सांगत आहेत. तुम्हा मुलांना आनंद झाला पाहिजे. बाबा भगवान आम्हाला शिकवत आहेत - याचा खूप आनंद झाला पाहिजे. बाबा सन्मुख शिकवत आहेत. बाबा जे सर्वांचा पिता आहेत, ते आम्हाला पुन्हा शिकवत आहेत. अनेकदा शिकवले आहे. जेव्हा तुम्ही चक्र फिरून पूर्ण करता तेव्हा पुन्हा बाबा येतात. या वेळी तुम्ही स्वदर्शन चक्रधारी आहात. तुम्ही विष्णू पुरीचे देवता बनण्यासाठी पुरुषार्थ करत आहात. दुनियेमध्ये इतर कोणीही हे नॉलेज देऊ शकणार नाही. शिवबाबा आम्हांला शिकवत आहेत, याचा किती आनंद वाटला पाहिजे. मुले जाणतात ही शास्त्रे इत्यादी सर्व भक्तिमार्गाची आहेत, सद्गतीसाठी नाहीत. भक्तिमार्गासाठी सामुग्री सुध्दा पाहिजे ना. अथाह सामग्री आहे. बाबा म्हणतात - याच्यामुळे तुम्ही घसरत खाली आला आहात (पतन झाले आहे). किती दारोदार भटकता. आता तुम्ही शांत होऊन बसला आहात. तुमचे धक्के खाणे सर्व बंद झाले आहे. जाणता की बाकी थोडा वेळ आहे, आत्म्याला पवित्र बनवण्यासाठी बाबा तोच मार्ग दाखवत आहेत. म्हणतात - माझी आठवण करा तर तुम्ही तमोप्रधानापासून सतोप्रधान बनाल, मग सतोप्रधान दुनियेमध्ये येऊन राज्य कराल. हा मार्ग कल्प-कल्प अनेक वेळा बाबांनी सांगितला आहे. मग आपली अवस्था देखील बघायची आहे, स्टुडंट्स पुरुषार्थ करून स्वतःला हुशार बनवतात ना. अभ्यासाचे देखील रजिस्टर असते आणि वर्तणुकीचे देखील रजिस्टर असते. इथे तुम्हाला दैवी गुण धारण करायचे आहेत. दररोज आपला पोतामेल ठेवल्यामुळे खूप उन्नती होईल - आज पूर्ण दिवसभरामध्ये कोणते आसुरी काम तर केले नाही ना? आपल्याला तर देवता बनायचे आहे. लक्ष्मी-नारायणाचे चित्र समोर ठेवलेले आहे. किती साधे चित्र आहे. वरती शिवबाबा आहेत. प्रजापिता ब्रह्माद्वारे हा वारसा देतात तर जरूर संगमावर ब्राह्मण-ब्राह्मणी असतील ना. देवता असतात सतयुगामध्ये. ब्राह्मण आहेत संगमावर. कलियुगामध्ये आहेत शूद्र वर्णाचे. विराट रूप देखील बुद्धीमध्ये धारण करा. आता आपण आहोत ब्राह्मण शिखा, मग देवता बनणार. बाबा ब्राह्मणांना देवता बनविण्यासाठी शिकवत आहेत. तर दैवी गुण सुद्धा धारण करायचे आहेत, इतके गोड बनायचे आहे. कोणालाही दुःख द्यायचे नाही. जसे शरीर-निर्वाहासाठी काही ना काही काम केले जाते, तसे इथे देखील यज्ञ-सेवा करायची

आहे. कोणी आजारी असेल, सेवा करू शकत नसेल तर मग त्यांची सेवा करावी लागते. समजा कोणी आजारी आहे, शरीर सोडले तर तुम्हाला दुःखी होण्याची किंवा रडण्याची गरज नाही. तुम्हाला तर एकदम शांतीमध्ये बाबांच्या आठवणीमध्ये राहायचे आहे. काहीच आवाज नाही. ते तर स्मशानामध्ये घेऊन जातात तर आवाज करत जातात - ‘राम नाम सत्य आहे’. तुम्हाला काहीही बोलायचे नाहीये. तुम्ही सायलेन्सद्वारे विश्वावर विजय मिळवता. त्यांचे आहे सायन्स, तुमचा आहे सायलेन्स.

तुम्ही मुले ज्ञान आणि विज्ञान यांचा यथार्थ अर्थ जाणता. ज्ञान आहे - समज आणि विज्ञान आहे - सर्व काही विसरणे, ज्ञानाच्याही पलीकडे जाणे. तर ज्ञानसुद्धा आणि विज्ञान सुद्धा आहे. आत्मा जाणते आपण शांतीधाममध्ये रहाणारे आहोत मग ज्ञान देखील आहे. रूप आणि बसंत. बाबा देखील रूप-बसंत आहेत ना. रूप देखील आहेत आणि त्यांच्यामध्ये साऱ्या सृष्टी चक्राचे ज्ञान देखील आहे. त्यांनी विज्ञान-भवन नाव ठेवले आहे. अर्थ काहीच समजत नाहीत. तुम्ही मुले समजता या वेळी सायन्स मुळे दुःख देखील आहे तर सुख देखील आहे. तिथे सुखच सुख आहे. इथे अल्पकालीन सुख आहे. बाकी तर दुःखच दुःख आहे. घरामध्ये मनुष्य किती दुःखी असतात. समजतात - एकदाचे मेलो तर या दुःखाच्या दुनियेतून सुटू. तुम्ही मुले तर जाणता - आम्हाला स्वर्गवासी बनविण्यासाठी बाबा आलेले आहेत. किती गदगद व्हायला पाहिजे. कल्प-कल्प बाबा आम्हाला स्वर्गवासी बनविण्याकरिता येतात. तर अशा बाबांच्या मतानुसार चालले पाहिजे ना.

बाबा म्हणतात - गोड मुलांनो, कधीही कोणाला दुःख देऊ नका. गृहस्थ व्यवहारामध्ये राहून पवित्र बना. आपण भाऊ-बहिणी आहोत, हे आहे प्रेमाचे नाते. दुसरी कोणतीही दृष्टी जाऊ शकत नाही. प्रत्येकाचा आजार आपला-आपला आहे, त्यानुसार सल्ला देखील देत राहतात. मुले विचारतात - ‘बाबा, अशी हालत होते, या परिस्थितीमध्ये काय करावे?’ बाबा समजावून सांगतात - भावा-बहिणीची दृष्टी खराब होता कामा नये. कोणतेही भांडण होऊ नये. मी तुम्हा आत्म्यांचा पिता आहे ना. शिवबाबा ब्रह्मा तनाद्वारे बोलत आहेत प्रजापिता ब्रह्मा शिवबाबांचा मुलगा झाला, साधारण तनामध्येच येतात ना. विष्णू तर आहे सतयुगाचा. बाबा म्हणतात - मी यांच्यामध्ये प्रवेश करून नवीन दुनिया रचण्यासाठी आलो आहे. बाबा विचारतात - तुम्ही विश्वाचे महाराजा-महाराणी बनणार का? होय बाबा, का नाही बनणार! हो, यामध्ये पवित्र रहावे लागेल. हे तर अवघड आहे. अरे, तुला विश्वाचा मालक बनवतो आहे, तू पवित्र राहू शकत नाहीस? लाज नाही वाटत? लौकिक वडील देखील म्हणतात ना - घाणेरडे काम करू नको. या विकारामुळेच विघ्न येतात. सुरुवातीपासून यावरच हंगामा होत आला आहे. बाबा म्हणतात - गोड मुलांनो, यावर विजय प्राप्त करायचा आहे. मी आलो आहे पवित्र बनविण्याकरिता तुम्हा मुलांना योग्य-अयोग्य, चांगले-वाईट विचार करण्याची बुद्धी मिळाली आहे. हे लक्ष्मी-नारायण आहे एम ऑब्जेक्ट. स्वर्गवासींमध्ये दैवी गुण आहेत, नरकवासींमध्ये अवगुण आहेत. आता रावण राज्य आहे, हे देखील कोणी समजू शकत नाहीत. रावणाला दरवर्षी जाळतात. शत्रू आहे ना. जाळतच आले आहेत. समजत नाहीत की हा आहे कोण? आपण सर्व रावण राज्यामध्ये आहोत ना, तर जरूर आपण असुर झालो. परंतु स्वतःला कोणीही असूर समजत नाहीत. बरेचजण म्हणतात देखील - हे राक्षसी राज्य आहे. यथा राजा-राणी तथा प्रजा. परंतु तेवढी देखील समज नाही आहे. बाबा बसून समजावून सांगत आहेत - रामराज्य वेगळे आहे, रावण राज्य वेगळे आहे. आता तुम्ही सर्वगुणसंपन्न बनत आहात. बाबा म्हणतात - माझ्या भक्तांना ज्ञान ऐकवा, जे मंदिरांमध्ये जाऊन देवतांची पूजा करतात. बाकी अशा प्रकारच्या माणसांसमोर डोकेफोड करू नका. मंदिरांमध्ये तुम्हाला खूप भक्त मिळतील. नाडी देखील पहायची आहे. डॉक्टर लोक नाडी बघितल्यावर लगेच सांगतात की यांना कोणता आजार आहे. दिल्लीमध्ये एक अजमलखाँ नावाचा एक प्रसिद्ध वैद्य होता. बाबा तर तुम्हाला २१ जन्मांकरिता एव्हर हेल्दी, वेल्दी (सदा निरोगी आणि समृद्ध) बनवतात. इथे तर सर्व आहेतच रोगी, अनहेल्दी. तिथे तर कधीही आजार नसतो. तुम्ही एव्हर हेल्दी, एव्हर वेल्दी बनता. तुम्ही आपल्या योगबलाद्वारे कर्मेंद्रियांवर विजय प्राप्त करता. तुम्हाला ही कर्मेंद्रिये कधीही धोका देऊ शकत नाहीत. बाबांनी समजावून सांगितले आहे - आठवणीमध्ये चांगल्या रीतीने राहा, देही-अभिमानी रहा तर कर्मेंद्रिया धोका देणार नाहीत. इथेच तुम्ही विकारांवर विजय प्राप्त करता. तिथे कु-दृष्टि असत नाही. रावण राज्यच नाहीये. तो आहेच अहिंसक देवी-देवतांचा धर्म. युद्ध इत्यादीचा काही प्रश्नच नाही. हे युद्ध देखील अखेर होणार आहे, यामध्ये स्वर्गाचा दरवाजा उघडणार आहे. पुन्हा कधी युद्ध होतही नाही. यज्ञ देखील हा शेवटचा आहे. मग अर्धाकल्प कोणताही यज्ञ होणारही नाही. यामध्ये सर्व कचरा स्वाहा होतो. या यज्ञातूनच विनाश ज्वाळा पेटली आहे, सर्व सफाई होणार. मग तुम्हा मुलांना साक्षात्कार देखील

करण्यात आला आहे, तिथले शूबीरस इत्यादी देखील अतिशय स्वादिष्ट फर्स्टक्लास गोष्टी असतात. त्या राज्याची आता तुम्ही स्थापना करत आहात तर किती आनंद झाला पाहिजे.

तुमचे नाव देखील आहे - शिवशक्ती भारत माता. शिवाकडून तुम्ही शक्ती घेता केवळ आठवणी द्वारे. धक्के खाण्याचा काही प्रश्नच नाही. ते समजतात जे भक्ती करत नाहीत ते नास्तिक आहेत. तुम्ही म्हणता जे बाबांना आणि रचनेला जाणत नाहीत ते नास्तिक आहेत, तुम्ही आता आस्तिक बनला आहात. त्रिकालदर्शी देखील बनला आहात. तिन्ही लोक आणि तिन्ही काळाविषयी माहित झाले आहे. या लक्ष्मी-नारायणाला बाबांकडून हा वारसा मिळाला आहे. आता तुम्ही ते बनत आहात. या सर्व गोष्टी बाबाच समजावून सांगतात. शिवबाबा स्वतः म्हणतात की, मी यांच्यामध्ये प्रवेश करून तुम्हाला समजावून सांगतो. नाहीतर मी निराकार कसे समजावून सांगू. प्रेरणेने शिकवता येते का? शिकवण्यासाठी तर मुख पाहिजे ना. गोमुख तर हे आहे ना. ही (ब्रह्मा बाबा) मोठी माता आहे ना, मानवी माता आहे. बाबा म्हणतात - मी यांच्याद्वारे तुम्हा मुलांना सृष्टीच्या आदि-मध्य-अंताचे रहस्य समजावून सांगतो, युक्ती सांगतो. यामध्ये आशीर्वादाची काही गोष्टच नाही. आदेशानुसार चालायचे आहे. श्रीमत मिळते. कृपेची गोष्टच नाही. म्हणतात - बाबा, घडोघडी विसरायला होते, कृपा करा. अरे, आठवण करणे हे तर तुमचे कामच आहे. मी काय कृपा करणार. माझ्यासाठी तर सर्व मुले आहेत. कृपा केली तर सगळेच तख्तावर बसतील. पद तर अभ्यासानुसार मिळणार. शिकायचे तर तुम्हाला आहे ना. पुरुषार्थ करत रहा. मोस्ट बिलवेड बाबांची आठवण करायची आहे. पतित आत्मा परत जाऊ शकत नाही. बाबा म्हणतात जितकी तुम्ही आठवण कराल तर आठवण करता-करता पावन बनाल. पावन आत्मा इथे राहू शकणार नाही. पवित्र बनली तर शरीर नवीन पाहिजे. पवित्र आत्म्याला शरीर अपवित्र मिळेल, असा कायदा नाही. संन्यासी देखील विकारातून जन्म घेतात ना. हे देवता विकारातून जन्म घेत नाहीत, ज्यामुळे मग संन्यास करावा लागेल. हे तर उच्च झाले ना. खरे-खरे महात्मा हे आहेत जे सदैव संपूर्ण निर्विकारी आहेत. तिथे राहून राज्यच नाही आहे. आहेच सतोप्रधान रामराज्य. वास्तविक राम देखील म्हणता कामा नये. शिवबाबा आहेत ना. याला म्हटले जाते राजस्व अश्वमेध अविनाशी रुद्र ज्ञान यज्ञ. रुद्र अथवा शिव एकच आहे. श्रीकृष्णाचे काही नाव नाही आहे. शिवबाबा येऊन ज्ञान ऐकवतात ते मग रुद्र यज्ञ रचतात तर मातीचे लिंग आणि शाळीग्राम बनवतात. पूजा करून मग तोडून टाकतात. जसे बाबा देवींचे उदाहरण सांगतात. देवींना सजवून खाऊ-पिऊ घालून, पूजा करून मग विसर्जित करतात. तसे शिवबाबा आणि शाळीग्रामांची अतिशय प्रेमाने आणि शुद्धतेने पूजा करून मग नष्ट करतात. हा आहे सर्व भक्तीचा विस्तार. आता बाबा मुलांना समजावून सांगत आहेत - जितके बाबांच्या आठवणीमध्ये रहाल तितके आनंदात रहाल. दररोज रात्री आपला पोतामेल बघितला पाहिजे. काही चुक तर केली नाही ना? आपला कान पकडला पाहिजे - बाबा, आज माझ्याकडून ही चूक झाली, क्षमा करा. बाबा म्हणतात - खरे लिहाल तर अर्धे पाप माफ होईल. बाबा तर बसले आहेत ना. आपले कल्याण करू इच्छिता तर श्रीमतावर चाला. पोतामेल ठेवल्याने खूप उन्नती होईल. खर्च तर काहीच नाही. उच्चपद मिळवायचे असेल तर मनसा-वाचा-कर्मणा कोणालाही दुःख द्यायचे नाही. कोणी काही म्हणत असेल तर ऐकून न ऐकल्यासारखे करायचे आहे. ही मेहनत करायची आहे. बाबा येतातच तुम्हा मुलांचे दुःख दूर करून कायमसाठी सुख देण्याकरिता. तर मुलांनी देखील असे बनायचे आहे. मंदिरांमध्ये सर्वात चांगली सेवा होईल. तिथे रिलीजस माइंडेड (धार्मिक वृत्तीचे) तुम्हाला खूप मिळतील. प्रदर्शनीमध्ये खूप येतात. प्रोजेक्टर द्वारे देखील प्रदर्शनीमध्ये, जत्रेमध्ये चांगली सेवा होते. जत्रेमध्ये खर्च होतो तर जरूर फायदा देखील आहे ना. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

१) बाबांनी योग्य-अयोग्यला समजण्याची बुद्धी दिली आहे, त्या बुद्धीच्या आधारे दैवीगुण धारण करायचे आहेत, कोणालाही दुःख द्यायचे नाही, आपसामध्ये भावा-बहिणीचे खरे प्रेम असावे, कधीही कु-दृष्टी जाऊ नये.

२) बाबांच्या प्रत्येक डायरेक्शनप्रमाणे चालत चांगल्या रीतीने शिकून आपणच आपल्यावर कृपा करायची आहे. आपल्या उन्नतीसाठी पोतामेल ठेवायचा आहे, कोणी दुःख देणाऱ्या गोष्टी बोलत असेल तर ऐकून न

ऐकल्यासारखे करायचे आहे.

वरदान:- ईश्वरीय रॉयल्टीच्या संस्काराद्वारे प्रत्येकाच्या विशेषतांचे वर्णन करणारे पुण्य आत्मा भव
सदैव स्वतःला विशेष आत्मा समजून प्रत्येक संकल्प अथवा कर्म करा; आणि प्रत्येकाची विशेषता बघणे, वर्णन करणे, सर्वांप्रती विशेष आत्मा बनविण्याची शुभ कल्याणाची कामना ठेवणे - हीच ईश्वरीय रॉयल्टी आहे. रॉयल आत्मे दुसऱ्यांनी सोडून दिलेली गोष्ट स्वतःमध्ये धारण करू शकत नाहीत, त्यामुळे नेहमी अटेंशन रहावे की, कोणाची कमजोरी अथवा अवगुण बघण्याचा डोळा कायम बंद असावा. एकमेकांचे गुणगान करा, स्नेह, सहयोगाच्या फुलांची देवाण-घेवाण करा तर पुण्यात्मा बनाल.

बोधवाक्य:- वरदानाची शक्ती परिस्थिती रूपी आगीला देखील पाणी बनवते.

||| ओम शांती |||

अव्यक्त इशारे:- आता संपन्न अथवा कर्मातीत बनण्याचा ध्यास धरा.

निराकारी स्वरूपाच्या अभ्यासातील मुख्य वरदान आहे - “कर्मातीत भव”. आकारी स्वरूप अथवा फरिश्तेपणाचे वरदान आहे - “डबल लाईट भव”! डबल लाईट अर्थात सर्व कर्म-बंधनांपासून हलके आणि लाईट अर्थात सदैव प्रकाश-स्वरूपामध्ये स्थित रहाणारे. असे डबल लाईट राहणारे कर्मातीत स्थितीला सहज प्राप्त करू शकतात. तर सेवेमध्ये आल्यावर हाच ध्यास धरा की मला संपन्न अथवा कर्मातीत बनायचेच आहे.